सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२/५८ ठ. क्र. ७८
दि. ५/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

४२/५८

विषय क्र. ५८ हा विषय क्रमांक ४२ मध्ये एकत्रित करुन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

लोकशाहीर कविराय राम जोशी यांच्या स्मरणार्थ टिळक चौक भागामध्ये सभागृह बांधणेविषयी तेथील स्थानिक रहिवाश्यांची मोठया प्रमाणात मागणी येत आहे. सदरचा भाग हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मोडत असल्याने या ठिकाणी कोणतेही सभागृह नसल्याने तेथे लहानशे सभागृह बांधणे आवश्यक आहे. या सभागृहाद्वारे अनेक लहान सहान कार्यक्रम देखील होऊन लोकांची सोय होणार आहे. तसेच साहित्य व कलाकारांना वाव मिळणार आहे.

तरी प्र.क्र. १४ अ मधील श्री. वल्लभ अपार्टमेंटजवळ उत्तरकसबा ११७९ या ठिकाणी असलेल्या सिटी सर्व्हे नं. २०२२ च्या समोर असलेले टिळक चौक लाकडी अड्डा शेजारी महानगरपालिकेचे ९०० चौरस फूटाची जागा उपलब्ध असून, तेथे सभागृह बांधण्यासाठी योग्य होणार आहे.

तरी सदर ठिकाणी लोकशाहिर कविराय राम जोशी यांच्या नांवे भव्य असे सभागृह बांधणे व त्यांचा अर्धपुतळा उभारणेकामी धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे. सदर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कविराय लोकशाहीर राम जोशी प्रतिष्ठान या रजिष्टर्ड संस्थेस सदर सभागृह विधायक कामासाठी ९ वर्षे ११ महिने कालावधीकरिता भाडेकराराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

O/C

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...38...ठ. क्र...60...
दि...9/6/15......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



हुतात्मा स्मृती मंदिर येथे ॲटोमॅटीक रिमोटवरील पडदे व तद्अनुषंगिक मेकॅनिजक बसविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीच्या अनुषंगाने कामाची तातडी पाहता मक्तेदार मुव्हर्स ॲन्ड डेकोरेटर्स, पुणे यांचेकडून र.रुपये ६,४०,०००/- अधिक १२.५ % व्हॅट याप्रमाणे इतक्या रकमेचे विषयांकित काम जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करुन तसेच बी.पी.एम.सी.ॲक्ट ६७ (३) नुसार करुन घेणेस तसेच सदर कामाअंती होणारे बिल नगरअभियंता विभागाकडील इमारत दुरुस्ती अथवा अन्य उपलब्ध बजेटमधून आदा करणेस, तसेच सदरची बाब माहितीस्तव मा. स्थायी समितीकडे तसेच मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. २७-१२-१४ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. १९, दिनांक १७-४-१५ चे शिफारशीने माहितीस्तव आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३५ ठ. क्र. ८९ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोमपा मध्ये आढळून आलेल्या गंभीर स्वरुपाच्या आर्थिक अनियमितता टाळण्याचे दृष्टीकोनातून काटेकोरपणे करावयाची कार्यवाहीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. आयुक्त यांनी त्यांचेकडील अ.शा.पत्र क्र./नआ/वै/३७, दिनांक २२-४-१५ अन्वये परिपत्रक निर्गमीत करणेत आलेले असून, सदर परिपत्रक माहितीस्तव मा. स्थायी समितीपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २२-४-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मा.म.न.पा.सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५०, दिनांक २-५-२०१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुली~~/~~प्रस्ताव~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...३६...ठ. क्र....८२...
दि...८/६/१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील क्रोकोडाईल व स्पॉटेड डिअर दुरुस्ती करणे कामाच्या र.रु. १३,६३,९०९/- इतक्या रक्कमेची वर्क ऑर्डरची माहिती घेणेकामी मा. स्थायी समितीकडे पाठविणेत आले असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ७९१, दिनांक २४-३-१५ ने तूर्त तहकूब असा निर्णय धेतलेला असून, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्रकरणी मानीव मंजूरी मिळालेने सदरची बाब माहितीस्तव मा.म.न.पा.सभेसमोर सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. ५-५-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...34...ठ. क्र...83
दि...8/6/15......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र. ३ कुमारस्वामी नगर अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १४/२०१५-१६ र.रुपये ९,९१,३७७/-इतकेचे तयार केले असून, सदर पूर्वगणनपत्रकास व बजेट तरतूदीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ५-५-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

उपरोक्त पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...३८..ठ. क्र...८४..
दि...०९/८/१५...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ३ मित्र नगर अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १३/२०१५-१६ र.रुपये ९,९८,१८५/-इतकेचे तयार केले असून, सदर पूर्वगणनपत्रकास व बजेट तरतूदीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ५-५-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

उपरोक्त पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका
९८.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 3९ ठ. क्र. ८५
दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. शासनाकडून प्राप्त १३ व्या वित्त आयोग अनुदान महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मलनित्सारण प्रकल्प योजनेचे खात्यामध्ये रक्कम वर्ग करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ५ अन्वये १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोग बाबतची कार्यपध्दती निश्चित करणे बाबतचे शासन निर्णयामधील (II) तेराव्या वित्त आयोगाच्या निधीतून घ्यावयाची अनुज्ञेय कामे - अ.क्र. ६ इतर अनुज्ञेय कामे i) केंद्र व राज्य योजना मंजूर पायाभूत सुविधा व आवास प्रकल्पावरील लोकवर्गणी (महानगरपालिका/नगरपरिषदेचा हिस्सा) यावरील खर्च व असे प्रकल्प पूर्ण करणेकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त निधी, असे नमूद आहे. त्याकरिता प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ६ अन्वये १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदान र.रु. ३,७२,५९,५३४/- मधून सदर आदा बिलाची देय रक्कम अदा करणेकरिता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान मलनित्सारण प्रकल्प करिता असलेले सिंडीकेट बँक येथील मनपाचे स्वतंत्र खाते क्र. ५४३०२१४००००१३ मध्ये वर्ग करुन सदर दोन्ही मक्तेदारास प्रस्तावा मधील उपलब्ध रक्कमेच्या मधून दोन्ही कंत्राटदार यांना प्रत्येकी रु. १.२५ कोटी रक्कम द्यावी. असा निर्णय मा. आयुक्तांनी घेतला असून, सदरची बाब माहितीस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक २७-४-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली. १३ वे वित्त आयोगामधून माटे बाग सुधारणा करणेबाबत निर्णय झालेला असून, यास्तव सदर माटे बागेकरिता १३ वे वित्त आयोगात प्रस्तुत रकमेतून रक्कम रुपये ५०.०० लाख तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूल/प्रतिकूल/स्थगित
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...२०.....ठ. क्र....८६
दि...८/६/१५......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सार्व.आरोग्य अभियंता व नगर अभियंता पदाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूदकामी सदर नगरअभियंता या पदाचे कामकाज श्री. चलवादी एल. एच. यांचेकडे व सार्वजनिक आरोग्य अभियंता या पदाचे कामकाज श्री. दुलंगे जी. एम. यांनी पहाणे तसेच नगरअभियंता या पदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ४५ मधील तरतूदीस अनुसरुन मा.मनपाचे मान्यतेने नियुक्ती करणे आवश्यक आहे. तथापि नगर अभियंता या पदी केवळ प्रशासकीय कामाचे सोयीस्तव श्री. एल. एच. चलवादी, उपअभियंता यांना काम पहाणेचे आदेश दिलेले असलेने सदरची बाब ही महासभेस निदर्शनास आणणे आवश्यक असलेने सदरचा प्रस्ताव माहितीस्तव मा. महासभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-५-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ५१ ठ. क्र. ८८ दि. ८/६/१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा. शासन पुरस्कृत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत पात्र सफाई कर्मचा-यांसाठी सदनिका बांधणे प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जागा बदलाच्या अनुषंगाने मंजूर पूर्वगणनपत्रकातील होणा-या काही आयटमच्या क्वाँटीटी मधील १० टक्के पेक्षा जास्त वाढीच्या अनुषंगाने तसेच मंजूर पूर्वगणनपत्रकात नमूद नसलेले व जागा बदलाच्या अनुषंगाने करावे लागणारे एक्स्ट्रॉ आयटम यास अनुसरुन तयार करणेत आलेल्या विषयांकित कामाचे सुधारीत पूर्वगणनपत्रक क्र.--/र.रुपये ३,४०,९५,१७८/- यास मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण समितीची मान्यता मिळणेकामी मा. प्र. आयुक्त यांचे दि. ६-४-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ७ दिनांक १४-५-१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५२ ठ. क्र. ८८ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४६ अ बेघर हौसिंग सोसायटी, सर्वोदय नगर, गरिबी हटाव नं. १ येथे ड्रेनेज लाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २४१/२०१४-१५ र.रु. १९,९८,१५४/- यांस मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.प्र.आयुक्त यांचे दि. ९-४-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १०, दिनांक १४-५-२०१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ५३ ठ. क्र. ८९
दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५३

प्र.क्र. ४६ अ येथे उत्कर्ष नगर येथे ड्रेनेज लाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २४२/२०१४-१५ र.रु. १९,९५,५६३/- यांस मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.प्र.आयुक्त यांचे दि. ९-४-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ११, दिनांक १४-५-२०१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासंगिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ५४ ठ. क्र. ९०
दि. ८/६/१५ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्र.क्र. ४६ अ येथे इंदिरानगर ते कोळी समाज सोसायटी पर्यंत संपूर्ण रस्ता डांबरीकरण करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १/२०१५-१६ र.रु. १५,६७,७०८/- यांस प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.प्र.आयुक्त यांचे दि. ९-४-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १२, दिनांक १४-५-२०१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.स...५५...ठ. क्र...९७...
दि...८/५/१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. २८ ब लक्ष्मी विष्णू चाळ ते नागनाथ मंदिर ड्रेनेज लाईन घालणे कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २३८/२०१४-१५ र.रु. १९,९७,९०५/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ५-५-१५ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ४९ ठ. क्र. ९२ दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेतील सध्याचे विधान सल्लागर पद हे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आले असून, सदर पद हे मुं. प्रा. महा. अधिनियमातील ५३ (३) मधील तरतूदीनुसार भरण्यात आलेले आहे. विधान सल्लगार पद भरण्यासाठी आस्थापना विभागाने ३५ टक्के खर्चाची अट शिथील न करता भरण्यात आलेले आहे. सहा. विधान सल्लागार पदासाठी मा. उच्च न्यायालयातील याचिकेमध्ये सदरचे पद भरणेसाठी निर्देश दिले असताना ते न भरता विधान सल्लागार पद हे शासनाच्या मंजूरीविना भरण्यात आले आहे. सध्या कार्यरत असलेले विधान सल्लागार श्री. सोनटक्के व माजी नगर अभियंता यांचे उच्च न्यायालयामध्ये सुनावनी व चौकशी प्रलंबित असूनही दरम्यान सावस्कर यांची चौकशी पूर्ण झाली असून चौकशी अहवाल मा. आयुक्ताकडे सादर केले असल्याचे सांगून मा. उच्च न्यायालयाची दिशाभुल केलेली आहे. विधान सल्लागार यांनी म.न.पा. च्या प्रकरणामध्ये अनेक विसंगत अभिप्राय दिलेले आहेत. कायदेशीरदृष्टया विधान सल्लागार पद हे महत्वाचे असून त्यांनी दिलेला अभिप्राय विसंगत असल्यास महापालिकेला त्याचे होणारे नुकसान सोसावे लागेल असे झाल्यास महानगरपालिका विद्यमान विधान सल्लागार यांचेवर कोणतीही कारवाई करु शकणार नाही. त्यामुळे या पदाचे महत्व जाणून महानगरपालिकेमध्ये आवश्यक ती शैक्षणिक अर्हता असलेल्या सेवकांस विधान सल्लागारपदी नियुक्त करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~सामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...43...ठ. क्र....93
दि...8/6/95........रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ११ दमाणि नगर परिसर हा मिल कामगार रहिवासी असलेले भाग आहे. सदर ठिकाणी १८/२० वर्षापूर्वी मिल चालू असताना बरेच अपार्टमेंटचे बांधकाम झालेले आहे. सदरची अपार्टमेंट ही बरेच ठिकाणी रजिष्टर गृहनिर्माण संस्था आहे. सदरचे अपार्टमेंट हे फार जुने असल्याने व त्यांचे परिसरात काही भागात फरशीकरण नसल्याने सदरचे अपार्टमेंट झाडं झुडपे वाढल्याने सरफटणारे प्राण्यांचा प्रादुर्भाव वाढलेला असल्याने फरशीकरण करणे लाईटची व इतर नागरी सुविधा करणे आवश्यक आहे. सदरचे पुढील ठिकाणचे अपार्टमेंट खासगी असल्याने मात्र फरशीकरण लाईट व इतर नागरी सुविधा केलेनंतर वापरण्याची जागा सर्वांना (सार्वजनिक वापर) वापर होणार असल्याने फरशीकरण करणे, लाईटचे कामे करणे व इतर नागरी सुविधा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**दमाणि परिसरातील अपार्टमेंट परिसरात करावयाची फरशीकरण - नावे**

१) गिरीराज अपार्टमेंट २) राखी अपार्टमेंट ३) नंदणी अपार्टमेंट ४) रितू अपार्टमेंट ५) नवनीत अपार्टमेंट ६) ओंकार अपार्टमेंट ७) दमाणि अपार्टमेंट ८) तारांगण अपार्टमेंट ९) गायत्री, गंगा, जमुना, सरस्वती व इतर कांही अपार्टमेंट.

सर्वच प्रभागामध्ये जेथे जेथे अपार्टमेंट आहेत तेथे अशा प्रकारची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासंगिक/ऐच्छिक
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४४ ठ. क्र. ९४
दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



माजी उपमहापौर तथा नगरसेवक कै. बाळासाहेब तात्यासाहेब घोंगडे यांचे समाजकार्य मोठया प्रमाणात झालेले आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे नांव प्रभागातील प्रियांका चौक ते गुरुदत्त चौक या मार्गावरील रस्त्यास त्यांचे नाव देणेबाबत नागरिकांची मोठया प्रमाणात मागणी येत आहे. यासाठी सदर मार्गास स्व. बाळासाहेब तात्यासाहेब घोंगडे मार्ग असे नांव देणे उचित होणार आहे. तरी प्र.क्र. ५ ब मध्ये प्रियांका चौक ते गुरुदत्त चौक या रस्त्यावरील मार्गास प्रसिध्द समाजसेवक कै. बाळासाहेब तात्यासाहेब घोंगडे मार्ग असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...४५...ठ. क्र.....८५
दि....८/६/९५.....रोजी ठेवला असता प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरातील जुने नामवंत वकील भारतभर तसेच समाजसुधारक पर्यावरण शुध्दीसाठी यज्ञ केलेले तसेच अग्नीहोत्र प्रचारक एक आदर्श सोनामाता शाळेचे संस्थापक आदरणीय कै. वाजपेयी महादेव अत्रे यांचे नांव १५८, रेल्वे लाईन दर्बी कलेक्शन सोनामाता कन्या विद्यालय हया मार्गास कै. वाजपेयी महादेव अत्रे मार्ग असे नामकरण करणेस, येणारे खर्चास व तसेच नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिकी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४६ ठ. क्र. ९९
दि. ८।६।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४७ मधील नविन आर.टी.ओ. ऑफिस ते राजस्व नगर मार्गावरील चौंडीश्वरी मंदिर जाई जुई नगर येथील चौकास कै. मातोश्री सुगंधा कोळी चौक असे नांव देणेस याकामी येणारे खर्चास व सदर ठिकाणी नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुदायिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ३७ ठ. क्र. ९७ दि. ८।६।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अमरज्योत बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्था, १६५, उत्तर कसबा, पत्रा तालीम सोलापूर ही संस्था नोंदणीकृत संस्था असून, शहर व जिल्हा पातळीवर विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था आहे. या संस्थेच्या कार्याचा विस्तार करण्याचा संस्थेचा मानस असून, त्यासाठी त्यांना मोठया जागेची आवश्यकता आहे. सबब वरील संस्थेस दत्त चौकातील अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर वरील संपूर्ण टेरेस (गच्ची) ची रिकामी असलेली जागा संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी, कार्यालयाकरिता व वाणिज्य वापरासाठी ज्या पध्दतीने बांधकाम परवानगी म.न.पा. देईल त्या पध्दतीने संस्था स्वखर्चाने बांधकाम करुन जागा भाडयाने देणेस व सदर जागा वरील संस्थेस दिल्यानंतर तिथे होणारे बांधकाम खर्च हे महानगरपालिका डिपॉझीट रक्कम समजण्यात यावे. त्यामुळे त्यांच्याकडून दुसरे कोणतेही अनामत रक्कम घेणेत येऊ नये यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

संबंधित संस्थेकडून डिपॉझीट घेऊन योग्य ते भाडे आकारुन टेरेस वरील जागा देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

कोल्हापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.स. ३९ ठ. क्र. ९९
दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र. ३५ अ मध्ये शास्त्रीनगर परिसरात म.न.पा.चा दवाखाना आहे. या दवाखान्यास कंपौंड वॉल असून नसल्यासारखे आहे. कारण या कंपौंडवॉल मध्ये व दवाखान्याच्या गच्चीवर अवैध धंदे सुरु असल्याचे समजते. त्यामुळे लहान मुले बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील दवाखान्याचे संपूर्ण नूतनीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे र.रु. ५०.०० लाख खर्च अपेक्षित आहे. तरी उपरोक्त दवाखान्याचे नुतनीकरण करणेसाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
कोल्हापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/[illegible]/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५० ठ. क्र. १०० दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ३५ अ मधील शास्त्रीनगर परिसरातील डॉ. अन्सारी चौक ते दत्त मंदिरा पर्यंतचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. तेव्हा सदरील रस्त्याची दुरुस्ती करुन डांबरीकरण किंवा सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे गरजेचे आहे. या रस्त्यावरुन नागरिकांना येणे-जाणे त्रासाचे होत आहे. तसेच वृध्दांना व लहान मुलांना चालण्यायोग्य रस्ता राहिलेला नाही. नमाजला जाणा-या - येणा-या लोकांना रस्त्यावरील खड्डया-खड्डयात पाणी साचून त्रास होत आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. तेव्हा लवकरात लवकर सदरील रस्त्याचे काम हाती घेणेसाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन येणा-या खर्चास अंदाजे खर्च र.रु. ५०.०० लाखाचा निधी तरतूद होऊन मिळणेस्तव मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~वार्षिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.व ५६ ठ. क्र. २०९
दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~सहमताने~~/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र. ११ मधील खमीतकर कॉम्प्लेक्स लगत माटे बगिचा असून या बागेमध्ये बाग सुधारण्याचे काम चालू आहे. तरी सदरील बागेस **गंगाई बाग** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५७ ठ. क्र. १०२ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन २०१२-१३ व १३-१४ या आर्थिक वर्षात शहरातील कांही विहीरीतील गाळ काढून यातील पाण्याचा पुरवठा जनतेला करण्याचे दृष्टीने निधी मंजूर करण्यात आला होता. मार्च १४ मध्ये पाणी संकटाचे वेळी वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या निर्णयाची पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने किती उपयोगाचे ठरले, या कामावर किती निधी खर्च झाला, सद्यस्थिती काय व ही कामे कांही ठिकाणी अपूरे राहिल्यास प्रशासनाकडे कोणती उपाय योजना आहे, या माहितीसह व यावर मा. आयुक्तांचे अभिप्रायासह सभागृहापुढे १५ दिवसाचे आत सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रानुसूची~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ५९ ठ. क्र. १०३ दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सुदर्शन हरी सर्वगोड, वय ४५ वर्षे राहणार हब्बू वस्ती देगांव नाका सोलापूर त्यांना अर्धांगवायू (लकवा) हा आजार झाला असून त्यांच्यावर गंगामाई हॉस्पीटल सोलापूर मध्ये उपचार चालू आहेत. त्यासाठी त्यांना र.रु. २.०० लाख खर्च येणार आहे. श्री. सुदर्शन हरी सर्वगोड यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तरी श्री. सुदर्शन हरी सर्वगोड रा. हब्बू वस्ती देगाव नाका सोलापूर यांना सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...60...ठ. क्र...904 दि...8/6/94.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ. रमाबाई गौतम गायकवाड रा. बहुरुपी नगर, विजापूर रोड सोलापूर यांना कॅन्सरचा आजार झाला असून त्यांच्यावर सिव्हील हॉस्पीटल सोलापूर या हॉस्पीटलमध्ये उपचार चालू आहे. सौ. रमाबाई गौतम गायकवाड यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तरी सौ. रमाबाई गौतम गायकवाड बहुरुपी नगर विजापूर रोड सोलापूर यांना औषधोपचारासाठी सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ६९ ठ. क्र. १०५
दि. ८/६/१४ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्र.क्र. ३१ रामवाडी येथील सिटी सर्व्हे नं. ४१३/२२८ या जागेवर असलेली १५०० चौ. फुट जागा ही महानगरपालिकेस अभ्यासिका केंद्र बांधण्यास विनामुल्य श्री. पांडूरंग गोविंद साबळे रहा. १४ अ, जवान नगर, विजापूर रोड, सोलापूर यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर ठिकाणी बुध्दविहार बांधणेकरिता अभिप्राय मिळालेला असून, सदर ठिकाणी सन २०१३-१४ भांडवली कामे मा. महापौर व मा. सभागृह नेता सुचवितील तेथे बुध्दविहार सुधारणा करणे या कामामधून र.रु. १५.०० लाख उपलब्धही करुन देण्यांत आले आहेत. मात्र सदर ठिकाणी बुध्दविहार ऐवजी अभ्यासिका केंद्र बांधणेस व याप्रमाणे कामातील बदलासही मान्यता मिळून जरुर ती कार्यवाही होणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगी~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..62..ठ. क्र..906
दि...21.6.15......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

६२

प्र.क्र. ३१ मधील रामवाडी येथे **१)** नितीन जाधव घरापासून ते संतोष गायकवाड घरापर्यंतच्या रस्त्यास **कै. शिवलाल गायकवाड मार्ग** असे नामकरण करणे **२)** रामू जाधव घर ते दोडमनी दुकानापर्यंतच्या रस्त्यास **कै. मोहन जाधव मार्ग** असे नामकरण करणे **३)** कुलकर्णी घर ते जतकर घरापर्यंत **कै. सिद्राम नुला मार्ग** असे नामकरण करणे **४)** शेख घर ते कोलारकर यांचे घरापर्यंतच्या रस्त्यास **कै. शिवाजी गायकवाड मार्ग** असे नामकरण करणे **५)** कतनाळे घर ते सोमनाथ जाधव यांचे घरापर्यंत **कै. विठ्ठल जाधव मार्ग** असे नामकरण करणे **६)** मरगू जाधव घर ते सुरेंद्र गायकवाड यांचे घरापर्यंतच्या रस्त्यास **कै. राजेश गायकवाड मार्ग** असे नामकरण करणे तरी वरील विविध क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींची नांवे रस्त्यास/चौकास नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.जा. २०९ ठ. क्र. ९०८ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जोडभावी पेठ मंगळवार बाजार येथे आधुनिक मत्सबाजार पेठ उभारणे, तात्पुरते पत्राशेड उभारणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ ३ (क) नुसार मक्तेदार विनायक इंगळगी यांचेकडून र.रुपये ४,६४,०८७/- इतक्या रक्कमेत मा. आयुक्त यांचे मान्यतेअंती जागेवर कामास सुरुवात करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २६-१२-१४ चे टिपणीने मा. स्थायी समिती ठराव क्र. ६६९, दिनांक ४-२-२०१५ चे शिफारशीने माहितीस्तव आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९२ ठ. क्र. १०८
दि. ९/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बस भाडयाचे तिकीट व पासेसचे दरामध्ये कपात करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावातील नमूद पान क्र.०४ साधे बसभाडयाचे तिकीट दर, पान क्र.५ मधील व्हॉल्व्हो बस भाडयाचे तिकीट दर व पान क्र.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व प्रस्तावित केल्याप्रमाणे व्हॉल्व्हो ए.सी. बसेस व साधे बसेस करितां येणारे दैनंदिन पास व मासिक पासेस मध्ये अल्पसा बदल करणेत आला असून, सदर तक्त्यांचे अवलोकन होवून, त्याचप्रमाणे दैनंदिन व मासिक पासेस सुधारित दराप्रमाणे करावयाच्या दराची अंमलबजावणी नियमावलीचे अवलोकन होवून, सदरचा प्रस्ताव प्रायोगिक तत्वांवर मा.परिवहन समिती मार्फत मा.महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक १३.०२.२०१५ च्या टिपणी प्रमाणे मा. परिवहन समिती ठराव क्र. ९६, दिनांक २६/२/२०१५ चे शिफारशी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सविस्तर माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९३ ठ. क्र. १०९
दि... ८.६.१५...... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील ६५ वर्षावरील वरिष्ठांना बस भाडयात ५०% सवलत देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सुरुवातीला सन २०१४-१५ या वर्षात ओळखपत्र घेवून बसमधून प्रवास करणारे ज्येष्ठ नागरिकांची संख्या किमान ५००० इतकी गृहीत धरल्यास वार्षिक रु. १,८२,५०,०००/- इतकी व मासिक रु. १५,२०,८३३/- इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध होवून मिळणेस अथवा प्रति लाभार्थी मासिक रु. ३०५/- व वार्षिक ३,६५०/- इतके अनुदान संबंधित लाभार्थींचे संख्या व नोंदीनुसार सो.म.पा. परिवहन उपक्रमास प्राप्त झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना सदरची सवलत उपलब्ध करुन देता येईल. सोलापूर शहर हद्दवाढ भागातील ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवास भाडयात ५०% सवलत मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. परिवहन समिती, सो.म.पा. यांचे मान्यतेअंती सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक - **अ** मध्ये सदरचे अनुदानाची रक्कम तरतूद होवून उपक्रमास रक्कम उपलब्ध होवून मिळालेस मागणीप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना सवलत देता येणे शक्य होणार आहे. तरी मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा. यांचे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. १६-१२-१४ चे टिपणी प्रमाणे मा. परिवहन समिती ठराव क्र. ९९, दिनांक २६/२/२०१५ चे शिफारशी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सविस्तर माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९४ ठ. क्र. ११० दि. ९/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४९४

प्रभाग क्र. २२ ब मार्कडेय बल्ला समाज मंदिरासमोरील खुल्या जागेमध्ये बालोद्यान करणेबाबत प्रस्तावात नमूद जागेत व नमूद कारणास्तव र.रुपये २४,८५,४७०/- नियुक्त आर्किटेक्ट यांनी तयार केलेले कामाचे प्लॅन एस्टीमेट र.रुपये २४,८५,४७०/- चे पूर्वगणनपत्रकास मा. आयुक्त यांचे दिनांक ८-१-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. मंडया नि उद्यान समिती व मा. स्थापत्य समितीच्या शिफारशीसह मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणी मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. ९, दिनांक १२-२-२०१५ चे शिफारशीसह मा. स्थापत्य समिती मार्फत मा. महानगरपालिकेची मान्यता मिळणेकामी मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ४५४, दिनांक ५-३-२०१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३८५ ठ. क्र. २२२
दि. ८/१/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महिला व मुलींकरिता विविध तांत्रिक व व्यवसायिक प्रशिक्षण बजेट सुधारणा करुन मिळणेबाबत प्रस्तावात नमूद विवरण असून, व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाचे सन २०१४-२०१५ चे मूळ तरतूद र.रु. ३०.०० लाखामध्ये तरतूद र.रु. २४.५० लाख इतकी रक्कम प्रस्तावात नमूद हेडमधून मिळणेस व प्रस्तुत रकमेस महिला व बालकल्याण समितीची मंजूरी मिळणे मान्यतेअंती मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव प्रस्ताव पाठविणेकामी मा. महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १८, दिनांक २-१-२०१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५००.ठ. क्र. ९९२
दि. ९.६.१५ ......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



मल्लव्वाबाई वल्याळ मेमोरियल डेंटल कॉलेज संस्थेच्या मिळकत कर आकारणीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव संबंधित मल्लव्वाबाई वल्याळ मेमोरियल डेंटल कॉलेज कडून र.रु. ९३,०९,७६१/-इतकी थकबाकी असून सदर थकबाकीबाबत विशेष कार्यकारी अधिकारी शहर हद्दवाढ यांनी दिनांक २०-१-२०१५ रोजी सादर केलेल्या टिपणीवर मा. अतिरिक्त आयुक्त यांनी केलेले टिपणी त्यावर मा. आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार पुन्हा अतिरिक्त आयुक्त यांनी पूर्व पृष्ठावातील विभाग/खातेप्रमुखानी प्रस्तावित टिपणीत शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेला ए शिफारस प्रस्ताव अवलोकन व्हावा. त्यानुसार मिळकतदार संस्थेने कर आकारणी (मुळ व सुधारीत) होणारी रक्कम भरणेस दिलेली नोटीस रद्द करुन मुदतीची सवलत मागितली आहे. अशा मुदत सवलतीबाबत शिफारस केली आहे. त्यावर मा. आयुक्त यांनी आवश्यक तो आदेश प्रसारित करुन त्यानंतर मा. आयुक्त यांनी नोटीस फी र.रु १५,८५५/-, वारंट फी र.रु. ३६,९९१/- व शास्ती र.रु. ८,४९,९१४/- अशी एकूण र.रु. ९,०२,७६०/- आयुक्त म्हणून माफ करीत आहे. इतर सवलतीबाबत महासभेसमोर हा विषय पाठवावा त्यास अनुसरुन मा. आयुक्त यांचे दिनांक ६-२-२०१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५०२ठ. क्र. ९९३ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५०२

एकवट मानधनावरील सहा. उद्यान अधिक्षक यांना नव्याने मानधनावर नियुक्ती देणेबाबत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तक्त्यात नमूद उमेदवार यांचे नियुक्ती रद्द करुन श्री. विश्वास अभिमान शिंदे हे उमेदवार आजला कार्यरत असलेने दिनांक ५-१-२०१५ पासून एकवट मानधन रुपये १८०००/- यावर ६ महिन्याच्या कालावधीकरिता नेमणूक करणेकामी मा. सहा. आयुक्त (स) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर मा. प्रभारी आयुक्त यांनी प्रथम नियुक्ती दिनांक १-१-१३ पूर्वी मा. स्थायी समितीची पूर्व मंजूरी घेतली होती काय ? उपरोक्त पदावर नव्याने हंगामी पदावर त्याच व्यक्तीची मुदतवाढ नियुक्ती होणार असलेस इतर कांहीही असलेतरी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे अपरिहार्य आहे. मा. सर्वसाधारण सभेस निर्णयास्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक २१-२-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुलो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...५०३...ठ. क्र....११४...
दि...४।६।१५......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ साली महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत विकास कामासाठी अनुदान उपलब्ध होणेबाबत प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) माध्यमातून सोलापूर शहरातील विविध भागातील नागरी सुविधासाठी विविध रस्ते विकास कामे करणेच्या अनुषंगाने त्या मा. शासनाकडून भरीव अनुदान सोबत जोडलेल्या यादीनुसार विकास कामासाठी अनुदान उपलब्ध होणेकामी अलहिदा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस सादर करणेत आलेले असून, प्रकरणी सोबतच्या यादीतील पुर्वगणनपत्रकास व एकूण विकास कामाचे खर्चाचे र.रु. ३.८० कोटीचे ५० टक्के म.न.पा. हिस्सा र.रु. १.९० कोटी इतकी बजेट तरतूद उपलब्ध होणेकामी मा.प्रभारी आयुक्त यांचे दिनांक १६-२-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले. सोबतच्या यादीप्रमाणे कामे करण्यांस मान्यता देणेत येत आहे. तरतुदीबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/प्रथम सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५०४ ठ. क्र. ९९५
दि. ८।६।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (उजनी धरण उद्‌भव) व सुधारणा करणे प्रकल्प अहवालास प्रस्तावात नमूद कारणास्तव र.रु. १४४१.६७ कोटी रकमेचा डी.पी.आर.यांस मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ दिनांक १३-५-२०१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तरी सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा (उजनी धरण उद्‌भव) व सुधारणा करणे योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) (र.रु. १२४०.५६ कोटी) मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रकल्प अहवाल मा. राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (सुधारीत) अंतर्गत योजनेत समाविष्ठ करणेस या महाअभियानाच्या वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे प्रकल्प किमतीच्या ३० टक्के मनपा हिस्सा (र.रु. ३७२.१७ कोटी) भरणेस तयार असलेबाबत तसेच सुधारीत शासन निर्णय दि. २१-०८-२०१४ नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत महापालिकेच्या हिस्स्याची रक्कम भरण्यांस तयार असल्याबाबतचा ठराव पारित होणेस्तव व आवश्यक मनपा हिस्सा तरतूद होणेस्तव मा.प्रभारी आयुक्त यांचे दि. २६-२-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. ३० टक्के रक्कम मनपा हिस्सा भरणेस तयार आहे. सदरची रक्कम तरतूद करणेकामी मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५०५ ठ. क्र. ९१६
दि. ८।६।१५ ......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ साली महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत विकास कामासाठी अनुदान उपलब्ध होणेबाबत तरी प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) माध्यमातून सोबत जोडलेल्या अ.क्र. १ ते ३७१ कामाचे यादीनुसार विकास कामासाठी अनुदान उपलब्ध होणेकामी अलहिदा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस सादर करणेत आलेले आहे. अ.क्र. १ ते ३०७ या कामाचे पूर्वगणनपत्रकास मा.म.न.पा.ठराव क्र. १०८, दिनांक २६-८-२०१४ ने मान्यता दिलेली आहे. उर्वरीत ३०८ ते ३७१ या कामाचे पूर्वगणनपत्रकास मान्यता मिळणेस एकूण अ.क्र. १ ते ३७१ या विकास कामाचे खर्चाचे र.रु. ६०.७५ कोटीचे ५० टक्के म.न.पा. हिस्सा र.रु. ३०.३७५ कोटी इतकी बजेट तरतूद उपलब्ध होणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १६-२-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोबतच्या यादीतील एकूण ५०३ कामे यांस व त्याचे पूर्वगणनपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर तरतूदीबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| २१ | डोणगांव रोड ते एस.एल. गायकवाड सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६ मरिआई मंदीर , विठ्ठल मंदीर सेटलमेंट | ३०.०० |

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~भांडवली/विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ५१८ ठ. क्र. ११८ दि. ८/६/१५ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरामध्ये जन्नतुल फिरदोस मुस्लिम कब्रस्थान प्रभाग क्र. ३० येथे विविध सुधारणा करणे कामाबाबत (फेज २) प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १/२०१५-१६ र.रु. १,२६,८२,०००/- इतके तयार केले असून, सदर कामाकरिता सन २०१५-१६ भांडवली कामे मधील स्मशानभूमी सुधारणा करणे या बजेट सदरातून र.रु. १,२६,८२,०००/- इतक्या रकमेची तरतूद होऊन मिळणेस्तव व पूर्वगणनत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्तावात नमूद प्रमाणे सादर करणेस्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक १६-३-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील जन्नतुल फिरदोस मुस्लीम कब्रस्थान याकरिता र.रु. ५०.०० लाखाची तरतूद करणेत आली असून, त्यानुसार काम हाती घेणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-१/४३० ठ. क्र. ११८ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/५३०

विभागीय कार्यालय क्र. १ लाईट विभागाकडील टेंपररी मजूर श्री. सैफन रहिमान शेख यांचे मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव श्री. सैफन शेख, मजूर (टेंपररी मस्टर) यांना दि. ३१-३-२०१४ चे मान्यतेने देण्यात आलेली दिनांक १०-१२-२०१३ पासून ११ महिनेची मुदत दि. ९-११-२०१४ रोजी संपुष्टात आलेली असल्याने व विभागीय कार्यालयाकडील विद्युत विभागाकडे सध्या सेवक वर्ग कमी असल्याने, श्री. सैफन रहिमान शेख, टेंपररी मजूर म्हणून मुदतवाढ मिळणेबाबत विभागीय अधिकारी वि.का.क्र.१ यांचे निवेदनास अनुसरुन प्रकरणी श्री. सैफन शेख टेंपररी मजूर हे आजलाही कार्यरत असल्याने तसेच विभागीय अधिकारी यांचे निवेदन पाहता त्यांची पूर्ण वेळ सेवा आवश्यक असल्याची बाब पाहता त्यांच्या सेवेमध्ये दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. १२-११-२०१४ पासून ११ महिने मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्याने मा. सहा.आयुक्त (स) यांनी निवेदन सादर केले असता मा. प्रभारी आयुक्त यांनी प्रथम नियुक्ती दि. १-६-२००३ मा. सर्वसाधारण सभा निर्णयास्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक १३-३-२०१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.न.५०७ठ. क्र. ११८
दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ११ मधील न्यू लक्ष्मी चाळीकडून पावन गणपती कडे जाणारा दमाणी नगर रस्ता, गवळी वस्तीवरुन दमाणी नगरकडे येणारा रस्ता, पावन गणपती कडून दमाणी नगरकडे येणारा रस्ता, दमाणि नगर वरुन गवळीवस्तीकडे जाणारा रस्ता ज्या ठिकाणी एकमेकास मिळून चौक निर्माण होतो. त्या चौकास पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.नं. ५०९ ठ. क्र. ९२०
दि. ८।६।९५ रोजी ठेवता आलेला मो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कु. धनेश्वरी रामचंद्र पवार, राहणार १०२ मुरारजी पेठ, पाटील चाळ, सोलापूर हया गरिब व कष्टाळू असून प्रामाणिक आहेत. यांना ब्लड कॅन्सर झालेला आहे. त्यावर उपचार व शस्त्रक्रिया करणे त्यांना शक्य नाही. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक आहे. त्यांचे घरात कोणीच व्यक्ती कमवती नाही. तरी त्यांना त्यांच्या आजारावर उपचार व शस्त्रक्रिया करणेसाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळणेसाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५१० ठ. क्र. ११९
दि. ८।६।९५ ........रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५१०

प्रभाग क्रमांक ७ मधील मराठावस्ती या नावाने ओळखले जाणा-या भागातील नागरीक बांधवांनी मराठेशाहीचा थोर राजा व हिंदशाहि टिकविणारा आणि दिलेल्या शब्दाकरीता स्वत:चे जीव अर्पण करणा-या तसेच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणा-या तसेच अशा सर्व क्षेत्रातील ज्ञानाने प्रविण असणा-या, सागराचे पाणी कधी आटणार नाही हिंदुत्वाची आठवण कधी मिटणार नाही हाच जन्म काय हजारो जन्म घेतले तरी छत्रपती संभाजी महाराजांचे नाव कधीच विसरणार नाही म्हणूनच या ठिकाणी असलेल्या चौकास छत्रपती संभाजी राजे चौक असे नामकरण करणेची इच्छा व्यक्त केली आहे.

सबब वरील ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याची कथा त्यांचे कार्य कायमचे स्मरणात राहण्यासाठी सदरच्या चौकास **छत्रपती संभाजी राजे चौक** असे नामकरणे करणेस व सदर मार्गाचे नामफलक हे ग्रेनाईटचे तयार करुन घेण्यात येऊन या चौकात बसविण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५११.ठ. क्र. १२२
दि... ८/६/९५ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५११

प्रभाग क्रमांक ७ मधील शाहीरवस्ती या नावाने ओळखले जाणा-या भागातील नागरिक बांधवांनी या ठिकाणी असलेल्या चौकास उदयमुखी चौक असे नामकरण करणेची इच्छा व्यक्ती केली आहे. सबब वरील ठिकाणी असलेल्या चौकास **उदयमुखी चौक** असे नामकरण करणेस व सदर नावाचे ग्रेनाईटचे नामफलक तयार करुन घेण्यात येऊन या चौकात बसविण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५९२ ठ. क्र. ९२३
दि. ८/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ५ मधील ८३ भवानी पेठ, मड्डी वस्ती येथील पठाण बाबा दर्गा शेजारील चौकास एस.पी.चौक असे नामकरण करणेस, तसा फलक लावणेस याकामी नामकरण कार्यक्रमाचे येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.प्र. ५१३ ठ. क्र. ९२८
दि... ८/६/९५ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. बाबूराव एन. तिमीर राहणार- घर नं १८८ मोदी खाना, सोलापूर हे सध्या हृदय विकाराने त्रस्त असून त्यांचेवर एन.एम. वाडीया इन्टिटयुट ऑफ कार्डीओलॉजी पुणे येथे बायपास शस्त्रक्रीया झालेली आहे. आतापर्यंत त्यांचेवर ३ लाखावर खर्च झालेला आहे तथापी त्यांच्या घरची अर्थिक परिस्थीती अत्यंत हालाकीची असून त्यांना यापुढेही उपचारासाठी जास्त खर्च येणार आहे. तरी त्यांचेवर आजपर्यंत झालेला खर्च व आगामी होणारा खर्च तसेच त्यांची अर्थिक परिस्थीती पाहता सोलापूर महानगरपालिकेकडून त्यांना जास्तीत जास्त मदत करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५१४ ठ. क्र. १२५ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५१४

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते त्याप्रमाणे महात्मा ज्योतीराव फुले यांच्या मागे त्यांच्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले या धैर्याने व खंभीरपणे अनेक संकटावर मात करुन उभ्या राहिल्या. दलीत समाजाचा उध्दार करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महिलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन महिलांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत, त्या शिक्षणाच्या आद्यप्रणेती होत्या, त्यांचे सामाजिक कार्याप्रती सर्व भारतीय समाज नतमस्तक आहे. अशा या थोर माता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची पुण्यतिथी दि.१०/३/२०१५ रोजी पासून दरवर्षी १० मार्च रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची पुण्यतिथी व ३ जानेवारी रोजी जयंती निमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामंजूर/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ५९५ ठ. क्र. ९२६ दि. ८/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बबन एकनाथ वावरे, रहाणार चिंतलवार वस्ती, मोदीखाना, सोलापूर हे सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडे सन १९९२ पासून ते आजतागायत रोजंदारीवरच मा.सभापती, परिवहन समिती कार्यालयात कार्यरत होते. त्यांना कॅन्सर हा आजार झाला होता. त्यांच्यावर श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. बबन एकनाथ वावरे यांचे दि.१०/३/२०१५ रोजी उपचार चालू असताना निधन झाले आहे. वावरे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे. तरी श्री बबन एकनाथ वावरे यांना सोलापूर महानगरपालिके कडून जास्तीजास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५१६ठ. क्र. ९२०
दि. ८।६।९५ ......राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



लोकशाहिर, लावणीकार, कविराय राम जोशी यांनी शाहिरीच्या व लावणीच्या माध्यमातून सोलापूरचा नावलौकीक महाराष्ट्रात वाढविला. परंतू, त्यांचा पुतळा किंवा स्मारक सोलापूरात कुठेही नाही. म्हणून त्यांची स्मृती चिरंतन राहावी व नव्या पिढीस प्रेरणा मिळावी त्यासाठी त्यांचा पुर्णाकृती पुतळा सोलापूरात बसविणेस देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदरकामी येणारा खर्च हा अर्थ संकल्पातील शहरात पुतळे उभारणे या बजेटमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५९.ए.ठ. क्र. १२५
दि. ८।६।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील साधू वास्वानी उद्यान हे सोलापूर महानगरपालिका सदस्य, माजी सदस्य व महापालिका कर्मचारी यांना लग्न समारंभासाठी भाडयात ५० टक्के सवलतीच्या दराने भाडे आकारुन दिले जाते. त्याच धर्तीवर सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणा-या शाळा दिवाळी व उन्हाळी या सुट्टयांच्या कालावधीमध्ये लग्न कार्यासाठी सो.म.पा.सदस्य माजी सदस्य व कर्मचारी यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५२४ठ. क्र. ९२८ दि. १८/९/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी सार्वजनिक स्मशानभूमी आहेत. त्या ठिकाणी मयत झालेल्या मृत व्यक्तींना वाहून नेण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक झोनमध्ये अंत्यविधीस मोफत वाहन उपलब्ध करुन देणेत यावे. तसेच ज्या त्या समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे अंत्यविधीकरिता लागणारे साहित्यही त्यांना मोफत उपलब्ध करुन देणेत यावे आणि ज्या त्या स्मशानभूमी दफनविधी झाल्यानंतर त्याचठिकाणी त्यांना मृत्यु दाखलाही देणेची व्यवस्था करणेत यावी. याकामी येणारा खर्च हा सन २०१५-१६ स्मशानभूमी देखभाल दुरुस्ती व सुधारणा या सदरी टाकणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५२८ ठ. क्र. १३० दि. ८।६।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५२८

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते त्याप्रमाणे महात्मा ज्योतीराव फुले यांच्या मागे त्यांच्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले या धैर्याने व खंभीरपणे अनेक संकटावर मात करुन उभ्या राहिल्या. दलीत समाजाचा उध्दार करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महिलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन महिलांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत, त्या शिक्षणाच्या आद्यप्रणेती होत्या, त्यांचे सामाजिक कार्याप्रती सर्व भारतीय समाज नतमस्तक आहे. अशा या थोर माता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे कार्य सोलापूर शहरातील जनतेला सदैव प्रेरणादाई ठरावे यादृष्टीने थोर माता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा तयार करुन जुना एम्पलायमेंट चौक येथे बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

एम्प्लॉयमेंट चौक येथे दादासाहेब गायकवाड यांचा पुतळा व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा सुपर मार्केट येथील ज्योतिबाराव फुले यांचे पुतळयाजवळ आयलॅन्डमध्ये बसविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका